मोटार वाहन विभागाच्या वायुवेग पथकांना पोर्टेबल वजनकाटे खरेदी करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन

गृह (परिवहन)विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०७१७/प्र.क्र.१७३/परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक: ०६ ऑक्टोबर २०१७

वाचा :

१) परिवहन आयुक्त यांचे पत्र क्र. पआका/परिवहन सह आयुक्त/जा.क्र.१६८२७, दि. १७.१०.२०१६ चे पत्र.

२)क्र.पआका/का-२/सीतना-आधु/पोर्टेबल-वेब्रि/२०१७/जा.क्र.१०४२४, दि.१२.७.२०१७.

प्रस्तावना :

मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ११३ मध्ये क्षमतेपेक्षा जास्त वजनाची वाहतूक करण्यास प्रतिबंधात्मक तरतूदी आहेत. तसेच कलम ११४ नुसार जादा भारवाहक वाहनांची तपासणी करण्याचे अधिकार मोटार वाहन विभागास प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच कलम ११४ नुसार मोटार वाहन विभागाच्या अधिकाऱ्यास ज्या वाहनाबाबत शंका असेल असे वाहन वजनकाट्यावर आणण्याचे अधिकार आहेत. अशा वाहनाच्या तपासणीनंतर वाहनात जादा भार आढळल्यास ते उतरविण्याचे व असे केल्याशिवाय वाहन पुढे जावू न देण्याची तरतूद सदर कलमात आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम, कलम २२३ मध्ये तपशिलवार पध्दती नमूद केली आहे. संपूर्ण राज्यात जादा भारविषयक अंमलबजावणी अधिक तीव्रतेने करुन राज्यातील जादा भार वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी राज्यातील वायुवेग पथकांसहीत चालकांना योग्य (Portable) वजनकाटे उपलब्ध करुन देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :

राज्यात जादाभारविषयक अंमलबजावणी अधिक तीव्रतेने करुन राज्यातील जादाभार वाहतुकीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्यातील मोटार वाहन विभागाच्या ६३ वायुवेग पथकांना सहज बाळगण्यायोग्य ६३ पोर्टेबल (Portable) वजनकाटे खरेदी करण्यासाठी रु.१४.६७ कोटी इतक्या रकमेस पुढील अटींच्या अधिन प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

१) उद्योग,उर्जा व कामगार विभागाने शासकीय विभागांना खरेदीसाठी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार व नियमांतील तरतूदीनुसार खरेदी प्रक्रिया करावी.

२) पोर्टेबल वजन काट्याची किंमत व त्यावरील कराची रक्कम वाजवी असल्याची खात्री करण्याच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

३) वित्त विभागाने वेळोवेळी परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांनुसार, उपलब्ध निधी विचारात घेऊन या आर्थिक वर्षात सदर उद्दिष्टाखाली एकूण कार्यक्रमावर होणा-या खर्चाबाबत प्रस्ताव तपासण्यात यावा.

४) जादा भार नियमाची अंमलबजावणी करण्यासाठी पोर्टेबल वजन काट्यांचा उपयोग करताना, कार्यवाहीत पारदर्शकता रहाण्यासाठी वजन व चलन यांची यंत्रणा एकत्रित जोडली असणे आवश्यक आहे.

५) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध होणा-या निधीतून खर्च भागविणे आवश्यक आहे. याकरिता अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही.

यासाठी येणारा खर्च, मागणी क्र.बी-३, २०४१, वाहनांवरील कर, ०१ (०१)(०७) साधनसामुग्री खरेदी, २०४१ ०३३२ योजनांतर्गत या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध असणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२५५/१४६१, दि.१३.०९.२०१७ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३१०/व्यय-८, दि.१५.०९.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीने तसेच, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग-तीन, अ.क्र.४, २७ (२) अन्वये असलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००६१६१६३५९०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2017.10.06 16:04:50 +05'30'

(द.ह.कदम)
अवर सचिव, गृह (परिवहन)विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल, यांचे खाजगी सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरिक्षा)/ (लेखा वअनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई/नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. परिवहन उप आयुक्त (प्रशासन / लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय,मुंबई
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. उप सचिव नियोजन विभाग/वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१०.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग.
११.निवड नस्ती, परि-४